# भारतीय महाविद्यालय, अमरावती
## राष्ट्रीय सेवा योजना
## (सत्र - २०१७-१८)

**प्रा.पंडित ल.काळे**
कार्यक्रम अधिकारी
**प्रा.गायत्री सु.चवाळे**
महिला कार्यक्रम अधिकारी

## :- नियमित कार्यक्रम अहवाल -:

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित भारतीय महाविद्यालय, अमरावती येथील राष्ट्रीय सेवा योजना पथकामध्ये (१०० मुले व १०० मुली) अशा २०० विद्यार्थ्यांची मान्यता आहे. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण व्हावी. तसेच कर्तव्य दक्ष, लोकशाहीभिमुख, सुजान नागरिक निर्माण व्हावा. या हेतुने रासेयो पथकाद्वारे विविध उपक्रम राबविले जातात.

वर्षभरातून नियमित कार्यक्रम व विशेष शिबिर कार्यक्रम असे दोन विभागामध्ये राबविले जातात. त्यापैकी नियमित कार्यक्रमाद्वारे विविध उपक्रम राबविल्या जातात. या उपक्रमामध्ये वृक्षारोपण, परिसर स्वच्छता, व्यक्तिमत्व विकास, स्पर्धा परीक्षेसंदर्भात कार्यशाळा व मार्गदर्शन तसेच आरोग्यासंदर्भातील कार्यक्रमामध्ये रक्तगट चाचणी, नेत्रतपासणी, रक्तदान शिबिर, रासेयो सप्ताह, स्वच्छता पंधरवाडा महापुरूषांच्या जयंत्या निमित्त कार्यक्रम, महिला सक्षमीकरणासंबंधी कार्यक्रम इत्यादी राबविल्या जातात.

**१) वृक्षारोपण :-** दि.०१ जुलै २०१७ रोजी भारती महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोणाचा कार्यक्रम संपन्न झाला. यामध्ये प्राचार्य डॉ.आराधना वैद्य, प्राध्यापकवृंद व रा.से.यो.चे स्वयंसेवक यांनी वृक्षारोपण केले.

**२) स्वयंसे उद्यम - मार्गदर्शनपर कार्यशाळा :-** दि.२८ जुलै, २०१७ रोजी लोक बिरादरी भारत व भारतीय महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने स्वयं से उद्यम कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात अध्यक्षस्थानी मा.प्रा.रमेश बिजवे (अध्यक्ष भारतीय महाविद्यालय, अमरावती) होते. प्रमुख उपस्थिती मा.प्रा.डॉ.आराधना वैद्य (प्राचार्य भारतीय महाविद्यालय, अमरावती) होत्या. रा.से.यो.चे कायक्रम अधिकारी प्रा.पंडित काळे, महिला कार्यक्रमअधिकारी प्रा.गायत्री चवाळे उपस्थित होत्या.

**३) स्वच्छता व आरोग्य अभियान :-**

६ ऑगस्ट, २०१७ रोजी महाविद्यालय परिसर स्वच्छ करण्यात आला. पावसामुळे वाढलेले गवत, साचलेले पाणी, गांजर गवत, अस्थाव्यस्थ झाडाच्या फांद्या यामुळे डासांची उत्पत्ती मोठ्या प्रमाणावर आढळत होती. म्हणून स्वयंसेवकांनी ही मोहिम हाती घेतली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आराधना वैद्य यांनी स्वयंसेवकांशी हितगूज

केली व केलेल्या स्वच्छतेची पाहणी केली.

**३) क्रांतीदिन :-**

०९ ऑगस्ट, २०१७ रोजी क्रांतिदिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.आराधना वैद्य होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. तट्टे सर होते. डॉ.वैद्य मॅडम यांनी आपले विचार व्यक्त करतांना १९४२ च्या क्रांतीचे स्मरण करून दिले व देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्यांनी आपले बलिदान दिले. त्या सर्व हुतात्म्यांना वंदन केले. या कार्यक्रमाला कार्यक्रमाधिकारी प्रा.पंडित काळे व महिला कार्यक्रमाधिकारी प्रा.गायत्री चवाळे उपस्थित होते.

**४) पथनाट्यातून जनजागृती व वाहतूक नियंत्रण जनजागृती :-**

१५ ऑगस्ट २०१७ रोजी स्वातंत्र्य दिनाच्या पर्वावर ध्वजारोहणानंतर राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे वाहतूक नियंत्रण व महिला अत्याचार जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.आराधना वैद्य होत्या. तर भारतीय विद्यामंदिराचे कोषाध्यक्ष डॉ.सतिश कुळकर्णी तसेच एन.सी.सी. प्रथक प्रमुख प्रा.डॉ.रघुवंशी, डॉ.मंगला माटे उपस्थित होते.

या कार्यक्रमातून रा.से.यो.च्या विद्यार्थ्यांनी जनतेमध्ये वाहतुकीसंबंधी जागृती व्हावी व महिला सुरक्षेसंबंधी विषय अतिशय समर्थपणे पथनाट्याद्वारे मांडला.

या कार्यक्रमास कार्यक्रमाधिकारी प्रा.पंडित काळे, महिला कार्यक्रमाधिकारी प्रा.गायत्री चवाळे उपस्थित होते. तसेच या कार्यक्रम पाहण्यास सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी वर्ग बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शुभम हिवराळे यांनी केले तर आभार मनिषा अडसोड हिने मांडले. या कार्यक्रमासाठी रा.से.यो.च्या स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

**५) राष्ट्रीय सेवा योजना तर्फे स्वच्छता पंधरवाडा (१ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर) :-**

१ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. १ सप्टेंबर २०१७ ला महाविद्यालय परिसर स्वच्छ केला. या स्वच्छता मोहिमेमध्ये रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी प्रा.पी.एल. काळे व महिला कार्यक्रमाधिकारी प्रा.गायत्री चवाळे व रा.से.यो.च्या स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. या स्वच्छता उपक्रमाबद्दल प्राचार्य डॉ.आराधना वैद्य यांनी या स्वच्छता मोहिमेचे व स्वयंसेवकाचे कौतुक केले. या कार्यक्रमास प्रा.अनिल खांडेकर, प्रा.नितिन तट्टे हे प्रामुख्याने उपस्थित होते.

४ सप्टेंबर, २०१७ ला योगा प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. योगा प्रशिक्षक डॉ.संगीता देशमुख (क्रीडा विभाग) यांनी योगाविषयी अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले. ७ सप्टेंबर २०१७ रा.से.यो. पथकाद्वारे 'आपत्ती व्यवस्थापन' हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्राचार्य डॉ.आराधना वैद्य होत्या. तर प्रमुख वक्त्या डॉ.शार्लिष्ठा कुळकर्णी होत्या. अपघात, पूर, भूकंप, आग, इत्यादी बद्दल त्यांनी महत्वाचे मार्गदर्शन केले. दि.११ सप्टेंबर, २०१७ रोजी सकाळी बजरंग झोपडीत 'स्वच्छता दिंडी' या कार्यक्रमाचे आयोजन केले हाते. संपूर्ण परिसरातील प्लास्टीक, कचरा, ओला कचरा स्वच्छ केला. 'स्वच्छ भारत समृध्द भारत' अशा घोषणा दिल्या. दि.१३ सप्टेंबर, २०१७ रोजी महाविद्यालयात 'स्वामी विवेकानंद एक आदर्श' या कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.आराधना वैद्य होत्या. प्रमुख वक्त्या डॉ.अलका गायकवाड होत्या. डॉ.गायकवाड म्हणाल्या की, विवेकानंदाच्या विचाराची आज तरूणांना गरज आहे.

१५ सप्टेंबर, रोजी ज्युदो प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.आराधना वैद्य होत्या. प्रमुख मार्गदर्शक डॉ.दया पांडे होत्या. डॉ.दया पांडे म्हणाल्या की, मुलींनी स्वरक्षणासाठी तयार झाले पाहिजे. स्त्री ही अबला नसून सबला आहे. या कार्यक्रमाचे रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी प्रा.पंडित काळे व महिला कार्यक्रमाधिकारी प्रा.गायत्री चवाळे होत्या. या कार्यक्रमाचे संचालन शुभम हिवराळे यांनी केले तर आभार काजल आठवले हिने मानले. अशा प्रकारे महाविद्यालयात 'स्वच्छता पंधरवाडा' च्या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**६) २४ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोंबर राष्ट्रीय सेवा योजना सप्ताहाचे आयोजन :-**

भारतीय महाविद्यालयात रा.से.यो. सप्ताहानिमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये 'मतदान जनजागृती अभियान' व 'वित्तीय साक्षरता अभियान' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. 'मतदान जनजागृती' या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.दिपक गजभिये व प्रमुख पाहुणे प्रा.नितिन तट्टे होते. प्रा.तट्टे म्हणाले की मतदान करणे हा आपला अधिकार आहे तर प्रा.गजभिये म्हणाले की, भारतीय राज्य घटनेने हा अधिकार आपल्याला ~~प्रस्तत्न~~ प्रदान केला आहे. तो आपण बजवायलाच पाहिजे.

**७) रक्त गट चाचणी परीक्षण :-**

२७ सप्टेंबर २०१७ रोजी रा.से.यो.च्या माध्यमातून रक्तगट चाचणी परीश्रम कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ.दीपा कुलकर्णी, रा.से.यो., कार्यक्रम अधिकारी प्रा.पंडित काळे व महिला कार्यक्रमाधिकारी प्रा.गायत्री चवाळे उपस्थित होत्या. डॉ.दीपा कुळकर्णी म्हणाल्या की, रक्त हे अतिशय महत्वाचे असल्यामुळे आपल्या रक्त दानामुळे एखाद्याचा जीव वाचू शकतो. म्हणून प्रत्येकाने रक्त दान केले पाहिजे. या कार्यक्रमाचे संचालन शुभम हिवराळे याने तर आभार काजल आठवले हिने केले.

**९) रक्तदान शिबीर :-**

दि.०८ डिसेंबर २०१७ रोजी महाविद्यालयामध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. **संत गाडगेबाबा रक्तपेढी** ला रक्तदान करण्यात आले. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे मत डॉ.कविमंडन यांनी व्यक्त केले. आपल्या रक्त दानामुळे एखाद्याचा जीव वाचत असेल तर त्यासारखे दुसरे पुण्य नाही असेही डॉ.कविमंडन यांनी सांगितलेले. रक्तदाना संदर्भात प्राचार्य डॉ.आराधना वैद्य यांनी रक्तदात्यांना मोलाचे मार्गदर्शन केले व त्यांनी सर्व प्रथम करून २०१७ मधील भारतीय महाविद्यालयातील त्या प्रथम रक्तदात्याला ठरल्या त्यांची प्रेरणा घेऊन अनेकांनी रक्तदान केले. जवळ जवळ ६० रक्तदात्यांनी यावेळी रक्तदान केले.